SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX-2609000 E-mail: ba.section@unishivaj.ac.in
B.A. Exam. Section: 0231-2609116
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर–४१६००४ महाराष्ट्र
दुरध्वनी – ईपीबीएक्स – २६०९००० E-mail: ba.section@unishivaj.ac.in
बी. ए. परीक्षा विभाग:०२३१ – २६०९११६

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
with CGPA 3.52

शि.वि./ऑन एक्झामिनेशन/५९९

दिनांक – १३.०४.२०२३

# परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२२ या हिवाळी सत्राच्या जाहीर झालेल्या निकालापैकी काही विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये त्रुटी असलेबाबत काही संघटना व प्रसारमाध्यमांमार्फत निवेदने प्राप्त झालेली आहेत.

या संदर्भात विद्यार्थ्यांमार्फत प्राप्त निवेदनांची परीक्षा विभागाकडून शहानिशा केली असता निकालाबाबत विद्यार्थ्यांच्या विषयास कमी मार्क, अपेक्षेपेक्षा कमी मार्क्स्, ऑनलाईन निकाल न दिसणे, पात्रतेच्या कारणास्तव निकाल न दिसणे, दोन वर्षाच्या कॉम्बीनेशनमुळे निकाल न दिसणे इ. स्वरूपाच्या असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त निकालातील त्रुटी दूर करणेसाठी खालीलप्रमाणे बाबी महाविद्यालये व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी/आवश्यक कार्यवाहीसाठी सर्वच संबंधित घटकांना कळविणेत येत आहेत.

१. ज्या विद्यार्थ्यांना निकालातील विषयामध्ये अपेक्षेपेक्षा गुण कमी मिळालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी सदर विषयाच्या उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी नियमानुसार करणे अपेक्षित आहे.
२. ज्या विद्याार्थ्यांचे निकाल कॉम्बीनेशन इअरच्या कारणास्तव दिसत नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन निकाल जाहिर करणेची कार्यवाही परीक्षा विभागाकडून सुरू आहे.
३. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल पात्रता न झालेने राखीव आहेत अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत पात्रता विभागाशी तात्काळ संपर्क साधून पात्रता पूर्ण करावयाची आहे.
४. तसेच महाविद्यालय/अधिविभागामार्फत अंतर्गत कार्याचे गुण जमा न झालेने किंवा इतर तांत्रिक कारणाने निकालामध्ये # * आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ संबंधीत महाविद्यालय/अधिविभागांनी परीक्षा विभागास सत्वर कळवावी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ